# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ


|| मराठी तितुका मेळवावा ||

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

ऑगस्ट, 2017
वर्ष 37, अंक 8


## अध्यक्षीय



नमस्कार,

बृहन्महाराष्ट्र मंडळाचं (बृ. म. मं.) १८वे अधिवेशन मोठ्या दिमाखात मिशिगन राज्यातल्या ग्रँड रॅपिड्स शहरात साजरं झालं. दोनशेहून अधिक कार्यकर्त्यांनी “आपले अधिवेशन” ह्या संकल्पनेला अनुसरून आयोजित केलेला हा आनंदसोहळा जगभरातल्या ३,६०० मराठी भाषकांनी “याचि देहीं याचि डोळां” अनुभवला. “आपलेपणा” अगदी पावलो-पावली दिसून येत होता, जाणवत होता. खरं तर अधिवेशनातील कित्येक गोष्टींबद्दल लिहिता येईल, पण मंडळी खास करून लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे, शनिवार- ८ जुलै रोजी, सकाळी आयोजित केलेली “ग्रंथ दिंडी”. पारंपरिक मराठमोळ्या वेशभूषेतील ७५०-८०० उपस्थितांची ही भव्य मिरवणूक, ढोल-ताशाच्या कडकडाटात आणि लेझिमच्या ठेक्यावर वाजत-गाजत निघाली तेंव्हा अक्षरश: ह्या दिंडीने उभ्या ग्रँड रॅपिड्स शहराला इतकं भारावून टाकलं, की उत्स्फूर्तपणे स्थानिकच काय पण डिटेलिंगच्या कामावर नियुक्त केले गेलेले पोलीसदेखील न राहावून दिंडीमध्ये सामील होऊन फोटो काढून घेताना दिसले. हे बघितल्यावर का कोणास ठाऊक, पण भारतात नव्याने स्थायिक होऊ पहाणाऱ्या पार्शी समाजाच्या गोष्टीची मला आठवण झाली. गुजरात मधील संजानच्या राणाच्या दरबारात “आमचं राज्य हे दुधाने काठोकाठ भरलेल्या ह्या चषकासारखं आहे, इथे तुम्हाला मी कसा काय आश्रय देऊ?” ह्या हिंदू राजाच्या प्रश्नाला उत्तरादाखल पार्शी दस्तूराने साखरेची चिमूट त्या दुधात टाकली आणि तो राजाला म्हणाला, “ह्या दुधात जशी साखर मिसळली तसेच आम्ही तुमच्या समाजात मिसळू आणि तेव्हढंच नाही तर साखरेची गोडीदेखील ह्या समाजाला देऊ.” तसाच काहीसा प्रत्यय बृ. म. मंडळाच्या अधिवेशनातील दिंडीच्या प्रसंगातून आला.

दर दोन वर्षांनी आपल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन होतं आणि त्या दरम्यानच मंडळाच्या कार्यकारिणीच्या निवडणुकासुद्धा होतात. २०१७-१९ साठी मला, तसेच आमच्या समितीला निवडून दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार. आमच्या कार्यकारिणीची ओळख पुढील पानांवर थोडक्यात दिली आहे. एक गोष्ट मला खास करून इथे नमूद करावीशी वाटते, की ह्यावेळी निवडणुकीत ९५% मतदान झालं. आपणां सर्वांनी इतक्या मोठ्या संख्येने निवडणुकीत घेतलेला सहभाग निश्चितच आनंददायी आहे. पण त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाची गोष्ट अशी, की आपणां सर्वांना आमच्या समितीकडून कामाच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत ही! बदलत्या काळा प्रमाणे बदललेली आव्हाने आम्ही आपल्या सहकार्याने निश्चित पेलू अशी खात्री वाटते.

२०१९ सालचे, बृ. म. मंडळाचे १९वे अधिवेशन भरवण्याचा मान डॅलस-फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळास मिळाला आहे. प्रमुख संयोजक दिलीप राणे आणि त्यांचे सहकारी जोमाने कामाला लागले आहेत. आपण सर्वांनी ग्रँड रॅपिड्सच्या अधिवेशनास जसा भरगोस प्रतिसाद दिलात, तसाच आपल्या डॅलसमधे भरणाऱ्या पुढच्या अधिवेशनासदेखील द्यालच.

कळावे लोभ असावा.

आपला,

**- अविनाश पाध्ये**

(अध्यक्ष बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)

## या अंकात…


बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी परिचय ३
‘रंग मराठी मनाचे’- एक दिमाखदार ओपनिंग सेरेमनी ५
BMM Convention 2017- Survey Results ६
बृ. म. मं. २०१७ -अधिवेशन वृत्तांत व संक्षिप्त प्रतिक्रिया ७
उत्तररंग परिषद ९
श्रध्दांजली: आमचे दिलीप काका १०
चित्र-कल्पना: वाचन-संस्कृती ११
ई विभाग: बृ. म. मं. २०१७ अधिवेशन- सविस्तर प्रतिक्रिया
राशिभविष्य


*Click the above links to go to respective pages.*

## बृहन्महाराष्ट्र वृत्त


**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**

**स्थापना 1981 (शिकागो)**

**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**

Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription


**जाहिरातीचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 65 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या 25 तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेलने दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१७-२०१९)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | अविनाश पाध्ये | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| **सचिव** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **कोषाध्यक्ष** | मेघा ओझरकर | ह्यूस्टन, टेक्सास |
| **सदस्य:** | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| | सुनील ढवळीकर | प्लेन्सबरो, न्यू जर्सी |
| | अजय हौदे | अटलांटा, जॉर्जिया |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**(नियुक्त/ मताधिकार नसलेले) सदस्य**

**माजी अध्यक्ष:** नितीन जोशी शिकागो, इलिनॉय

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष:** आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर

**सदस्य:** राहुल कर्णिक, डॅलस, टेक्सास

**सदस्य:** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**

*vinata@gmail.com* or *newsletter@bmmonline.org*
Address: 3251 Thunderbird Court (E)
Aurora IL, 60503

## ई - विभाग

- **बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०१७ - सविस्तर प्रतिक्रिया**
- **राशिभविष्य ऑगस्ट, 2017 - दादा दामले** (न्यु जर्सी)

**वाचण्यासाठी संकेतस्थळ: click or visit -**
**http://bmmonline.org/vrutta-esahitya**

गेली काही वर्षे बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या कामात मदत करणारे **वैभव पुराणिक** (लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया) वृत्त संपादन- कामाच्या जबाबदारीतून स्वेच्छा-निवृत्त होत आहेत. बृहन्महाराष्ट्र वृत्तासंबधित त्यांनी आजवर केलेल्या मदतीबद्दल धन्यवाद!


**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**

# बृ. म. मंडळ कार्यकारिणी परिचय




**बृ. म. मं. कार्यकारिणी -** छायाचित्रात उजवीकडून: अध्यक्ष- अविनाश पाध्ये, सचिव- विद्या जोशी, सदस्य- सुनील ढवळीकर, संदीप बेलखोडे, कोमल चौक्कर, हेमा राचमाळे, अजय हौदे, कोषाध्यक्ष- मेघा ओझरकर, (**फोटोमधे अनुपस्थित:** माजी अध्यक्ष- नितीन जोशी, बृहन्महाराष्ट्र वृत्त संपादक- विनता कुलकर्णी.) **विश्वस्त समिती:** अध्यक्ष - आशिष चौघुले, सदस्य - राहुल कर्णिक, मोहित चिटणीस.

**अध्यक्ष: अविनाश पाध्ये** (बॉस्टन,न्यू इंग्लंड)

- गेली २२+ वर्षे न्यू इंग्लंड मराठी मंडळाशी संलग्न. मंडळाने आयोजित केलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बृ. म. मं.)१९९७ तसेच २०१३ च्या अधिवेशनात सक्रीय सहभाग.

- २०१३ च्या बृ. म. मं. अधिवेशनाचे यशस्वी सहसंयोजक, बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य २०१३-२०१५

- मराठी साहित्याची आवड, मंडळासाठी काही नाटके बसवली तसेच कामेही केली, काही कार्यक्रमांचे लेखन आणि दिग्दर्शन.

**सचिव: विद्या जोशी** (शिकागो, इलिनॉय)

- होमिओपॅथी डॉक्टर (B.H.M.S. India), आणि M.B.A ( Health care Administration, U.S.A.).'होमिओपॅथी एक वरदान' हे पुस्तक प्रकाशित.

- महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यकारिणीवर उपाध्यक्ष (२०१२), अध्यक्ष (२०१३), विश्वस्त (२०१४-२०१६); २०१४ पासून शिकागो मंडळाच्या मराठी शाळेच्या कामात आणि त्यांस राज्यस्तरीय मान्यता मिळण्यामधे पुढाकार. बृ. म. मंडळाच्या २०१७च्या अधिवेशनात मराठी शाळा शिक्षक पुरस्कार प्राप्त.

- 'एकजूट' 'प्रथम' ह्या विनानफातत्तवावरील सामाजिक संस्थांमधे पूर्वी स्वयंसेवाकार्य.

**कोषाध्यक्ष: मेघा ओझरकर** (ह्यूस्टन, टेक्सास)

- २०१४ मधे ह्यूस्टन महाराष्ट्र मंडळाची अध्यक्ष, या कारकिर्दीत 'सेवा', संस्थेकडून तसेच कॉंग्रेस- नेत्यांकडून ह्यूस्टन मराठी मंडळास मानपत्र, पुरस्कार प्राप्त.

- गेली १२ वर्षे उत्तर अमेरिकेत (यू एस ए आणि कॅनडामधे) वास्तव्य व विविध संस्थांमधे काम. बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य २०१३-२०१५.

- २०१३ मधे 'मल्टिपल स्क्लेलेरोसिस'' विषयी जागृतीसाठी १५० मैल सायकल राइड, 'हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी' संस्थेद्वारा गरजू लोकांसाठी घरे बांधण्यास मदतकार्य.

**सदस्य: संदीप बेलखोडे** (ऑस्टिन, टेक्सास)

- अमेरिकेत गेली सतरा वर्षे वास्तव्य. अमेरिकेतील पूर्व-पश्चिम किनारपट्टीची शहरे, आणि कॅनडामधील बऱ्याच मोठ्या शहरांमध्ये कामानिमित्त राहण्याची संधी. व्यवसायाने उद्योजक, बिझिनेस इंटेलिजन्स कन्सल्टंट, फॉर्च्युन १०० कंपन्यांसाठी व्यावसायिक बुद्धिमत्ता क्षेत्र-विषयक सल्लागार.

- सध्या ऑस्टिन मराठी मंडळावर कोषाध्यक्ष, २०१६मधे मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनात पुढाकर. ऑस्टिन मराठी मंडळावर तीन वर्षे समिती सदस्य, गेली दोन वर्षे व्यावसायिक कलाकारांना ऑस्टिन मंडळात आणण्यासाठी मुख्य समन्वयक, ऑस्टिन परिसरात पाच मोठ्या कार्यक्रमांचे यशस्वी संयोजन.

- सामाजिक कार्याची आवड असून यापूर्वीही विना नफा तत्त्वावरील क्रीडा (क्रिकेट) संस्थेमधे खजिनदार व सचिव म्हणून चार वर्षे कामाचा अनुभव.

**सदस्य: कोमल चौक्कर** (अर्वाईन, कॅलिफोर्निया)

- महाराष्ट मंडळ लॉस अँजलीस कार्यकारिणीवर कार्यानुभव. २०१५ मधे लॉस अँजलीस येथील बृ. म. मंडळाच्या अधिवेशनात सक्रीय सहभाग.

- स्थानिक व बृ. म. मंडळाच्या प्रकल्पांमधे सर्व वयोगटांना सामावून घेण्याचा, सदस्य संख्या वाढविणे हे एक उद्दिष्ट.

- मंडळाच्या मराठी शाळेच्या कामात २००९ पासून सहभाग.

- बृ. म. मंडळाच्या मराठी शाळेचे काम पुढे नेण्यात रस.

**सदस्य: सुनील ढवळीकर** (न्यू जर्सी)

- अमेरिकेत तीस वर्षांहून जास्त वास्तव्य.

- गेली सतरा वर्षे न्यू जर्सीमधे सुमा फूड्स हा मराठी खाद्यपदार्थांचा उद्योग चालवीत असून, बृ. म. मंडळाच्या २०१३च्या अधिवेशनात औद्योगिक पुरस्काराचा मान.

- याशिवाय कुमॉन (Kumon) च्या दोन केंद्रांचे संचालक.

- मराठी विश्व (न्यू जर्सी)मधे वीस वर्षांहून अधिक काळ सहभाग, गेली तीन वर्षे संचालक मंडळावर नेमणूक.

- कुमॉन नॅशनल ॲडव्हायजरी कमिटी, ग्लोबल ऑर्गनायझेशन ऑफ पीपल ऑफ इंडियन ओरिजिन (सेंट्रल न्यू जर्सी), अक्षय पात्र, जल्लोष ढोल ताशा, ओरिगामी (यू एस ए) अशा विविध संस्थांमध्ये संस्थापक, संचालक, सल्लागार, विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य म्हणून कामे करण्याचा प्रदीर्घ अनुभव.

**सदस्य: अजय हौदे** (अटलांटा)

- गेली २७ वर्षे अमेरिकेत स्थायिक असून गेली अनेक वर्षे विविध संस्थांबरोबर काम व नेतृत्व.

- २००५ मधे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचे संयोयक.

- अटलांटामधे पत्नी अनिता आणि मुले अमृता व अमेय ह्यांच्यासह वास्तव्य.

- बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य २०१३-२०१५.

- बृ. म. मंडळाच्या सध्याच्या उपक्रमांबरोबर काही नवीन उपक्रम व युवापिढीला सामावून घ्यायचे उद्दिष्ट.

**सदस्य: हेमा राचमाळे** (डेट्रॉइट, मिशिगन)

- गेली १९८९ पासून डेट्रॉइट मथील महाराष्ट्र मंडळात स्वयंसेवक अध्यक्ष, विश्वस्त ह्या नात्याने महाराष्ट्र मंडळ डेट्रॉइटच्या कामात सहभाग व नेतृत्व.

- २०१७ साली डेट्रॉइट मंडळाच्या संयोजनाने ग्रँड रॅपिड्स मिशिगन येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १८व्या अधिवेशनाच्या सह-संयोजक.

- उत्तर अमेरिकेतील विविध मंडळांमधे अधिक सलोखा, परस्परांना मदत, उपयुक्त माहितीची देवाणघेवाण वाढविणे, ५५+ वयोगटासाठी तसेच ५५च्या आतल्या वयोगटास बृ. म. मंडळात सामावून घेतांना, त्यांच्या आवडीनिवडी व सामाजिक प्रश्न लक्षात घेऊन, सकारात्मक कार्य करण्याचे ध्येय.

***** याशिवाय बृ. म. मंडळ कार्यकारिणीवर सदस्य *****

**माजी अध्यक्ष: नितीन जोशी:** (शिकागो)

**बृ. म. वृत्त संपादक: विनता कुलकर्णी** (शिकागो)

***

## बृहन्महाराष्ट्र मंडळ विश्वस्त समिती:

**अध्यक्ष: (२०१५-१७) - आशिष चौघुले** (होकेस्सीन, डेलावेअर)

- बृ. म. मंडळ कार्यकारिणी अध्यक्ष (२०११-२०१३), त्यापूर्वी कोषाध्यक्ष, सदस्य. विश्वस्त समितीवर (२०१३-२०१९).

- १९९४ पासून डेलावेअरमधे स्थायिक असून उत्तर अमेरिकेतील सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सहभाग. डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळाचे संस्थापक सदस्य व अध्यक्षपदावरकार्य. मराठी साहित्य, कला व नाटकांची आवड. काही लेखन प्रकाशित.

- ४ वर्षे सातत्याने 'युनायटेड स्टेट्स् प्रेसिडेन्ट्स् व्हॉलेंटरी सर्व्हिस अवार्ड' प्राप्त.

- 'सिटीग्रूप' मधे कार्यरत असून पत्नी डॉ. अश्लेषा व मुलगी अनुष्का यांच्यासमवेत होकेस्सीन, डेलावेअर येथे वास्तव्य.

**सदस्य - राहुल कर्णिक** (डॅलस, टेक्सास)

- गेली २० वर्षे अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमात सहभाग. उदा. बृहन्महाराष्ट्र मंडळ (बृ. म. मंडळ), आणि डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणीवर सदस्य व बृ. म. मंडळ प्रतिनिधी,

मराठी मित्र मंडळाचे संस्थापक, सदस्य व अध्यक्षपदावर कार्य

- बृ. म. मंडळाच्या २०१५च्या लॉस एंजलीस येथील अधिवेशनात देण्यात आलेल्या पुरस्कारांच्या निवड समितीवर सदस्य, बृ. म. मं. विश्वस्त समितीवर (२०१५-२०२१).

- डॅलस परिसरात पत्नी- प्रिया आणि मुलगी- त्रिशा यांच्यासमवेत वास्तव्य.

**सदस्य - मोहित चिटणीस (सिॲटल)**


- सिॲटल महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीवर कोषाध्यक्ष १९९३,९४ व २०१२; उपाध्यक्ष १९९५, अध्यक्ष २०११, बृ. म. मंडळाच्या सिॲटल येथील २००७च्या अधिवेशनकाळात 'बजेट ॲंड फिनान्स' समिती-प्रमुख.

- इंडिया असोसिएशन ऑफ वेस्टर्न वॉशिंग्टन (सिॲटल परिसर) कार्यकारिणी सदस्य, कार्यक्रम समन्वक १९८५-८९, भारतातील काही नामांकित संगीत कलाकारांच्या कार्यक्रमांचे संयोजक, कोषाध्यक्ष, असोसिएशन ऑफ अकौंटिंग ॲडमिनिस्ट्रेटर्स (वॉशिंग्टन चॅप्टर), काही लोककल्याणकारी संस्थांमधे सहभाग.

- बृ. म. मं. विश्वस्त समितीवर (२०१७-२०२३).

***



# रंग मराठी मनाचे -
## एक दिमाखदार ओपनिंग सेरेमनी!

**- सुशांत खोपकर** (डेट्रॉइट, मिशिगन)

बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अठरावं अधिवेशन पार पडलं. ग्रँड रॅपिड्सला ७-९ जुलै रोजी झालेला हा कला-संस्कृतीचा सोहळा लोकांना खूप आवडला. इतका, की कौतुकाचे, शाबासकीचे संदेश अजूनही येत आहेत! सगळे कार्यक्रम लोकांना आवडले, जेवणाची व्यवस्था आवडली, डेट्रॉइटच्या आदरातिथ्याने तर उत्तर अमेरिकेतली मराठी माणसं भारावून गेली. पण एका कार्यक्रमाची श्रोत्यांनी इतकी भरभरून स्तुती केली की खास त्याबद्दल लिहावं असं वाटायला लागलं. आणि तो कार्यक्रम म्हणजे आपला ओपनिंग सेरेमनी - 'रंग मराठी मनाचे'!



वेगवेगळे रंग, त्यातून तयार होणाऱ्या भावना आणि त्याचं मराठी मनाशी असलेलं नातं उलगडून दाखवणारा हा कार्यक्रम होता. तसं पाहायला गेलं तर काय होतं कार्यक्रमात? नाच होते, गाणी होती आणि सूत्रसंचालन होतं. मग कुणी म्हणेल की त्यात काय विशेष? तर विशेष असं, की यात २७५ स्थानिक कलाकार होते! वय वर्षं ५ ते ८० वयोगटातले! जशी नवीन जोशपूर्ण गाणी होती, तशीच जुनी, शांत, प्रसन्न गाणीसुद्धा होती. जसे तरुण मुलांचे नाच होते, तसेच अगदी लहान मुलांचे पण होते. सगळ्यांना बरोबर घेऊन केलेला, सगळ्यांसाठी असलेला हा कार्यक्रम होता. सहज, सुंदर सूत्रसंचालन, उत्तमोत्तम नाच, सुरेल गाणी, साथीला प्रकाशयोजना आणि मागच्या पडद्यावरची हलती चित्रे. यांमुळे हा कार्यक्रम इतका रंगत गेला, की समोर रंगांची उधळण होत असताना प्रेक्षक त्यात नकळत न्हाऊन निघत होते!



केशरी रंगापासून कार्यक्रमाला सुरुवात झाली. केशरी म्हणजेच भगवा रंग जसा आपल्या शिवाजी राजांचा, तसाच तो वारकरांच्या झेंड्यांचा. पांढरा रंग पावित्र्याचा म्हंटला, की आपल्या डोळ्यांसमोर पांढरीशुभ्र साडी नेसलेली देवी सरस्वती येते. शंकरालाही पांढऱ्या रंगाची फुलं आवडतात. हिरवा रंग म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर हिरवीगार धरती येते. निळा रंग कृष्णाचा, पावसाचा, समुद्राचा. गुलाबी रंग प्रेमाचा का बरं असेल? तर गुलाबी रंग लाल आणि पांढऱ्या रंगाच्या मिश्रणातून तयार होतो. लाल रंग उत्कटतेचा, तर पांढरा रंग शुचितेचा, मोकळेपणाचा आणि परिपूर्णतेचा. यांच्या मिलाफातूनच "प्रेम" ह्या भावनेचा जन्म होत असावा आणि म्हणूनच प्रेमाचा रंग गुलाबी असतो! पिवळा रंग सोनसळी उन्हांचा, लग्नातल्या हळदीचा, खंडोबाच्या उत्सवाला उधळणाऱ्या भंडाऱ्याचा... काळा रंग रात्रीचा, अंधाराचा, अज्ञानाचा, भीतीचा; तर लाल रंग शृंगाराचा, रक्ताचा आणि आपल्या सगळ्यांच्या लाडक्या गणपती बाप्पांचा!

कार्यक्रमाची सांगता झाली, सगळ्या रंगांच्या मिश्रणातून. "रंगपंचमीला जसे आपण एकमेकांना प्रेमाने रंग लावतो, तसेच एकमेकांशी प्रेमाने वागून आपल्या व्यक्तिमत्वाचे रंग आपण एकमेकांना वाटूयात, मराठी बंधुत्व जपूयात आणि ह्या परक्या मुलखातही अगदी गुण्यागोविंदाने राहूयात." या प्रेमाच्या संदेशाने.



सूत्रसंचलन प्रेक्षकांना येऊ घातलेल्या नृत्याच्या विश्वात घेऊन जात होतं आणि नृत्य इतकी देखणी होती, की डोळ्यांचं पारणं फिटत होतं! सहा नृत्यदिग्दर्शिकांनी (choreographers) सगळे नाच बसवले होते; अनघा हुपरीकर, मनीषा डोंगरे, Funaach डान्स अकॅडमी, मृण्मयी बंगाळ, स्मिता जोशी आणि वर्षा आंबर्डेकर. गेले सहा महिने सतत प्रॅक्टिसेस चालू होत्या. एवढ्या सगळ्या कलाकारांना घेऊन तालमी करायच्या कशा? आणि कुठे? अशावेळी डेट्रॉइटचे अविनाश आणि हेमा राचमाळे यांनी मदतीचा हात पुढे केला. त्यांनी प्रॅक्टिसेससाठी त्यांच्या ऑफिसची जागा देऊ केली. नाचासाठी लागणारे सगळे कपडे २७५ कलाकारांची मापे घेऊन भारतातून शिवून घेतले होते!

या एव्हढ्या मोठ्या कार्यक्रमाची दिग्दर्शिका व्हायचं शिवधनुष्य पेललं स्मिता जोशी हिने. ती स्वतः कार्यक्रमातील एकूण सहा नृत्यदिग्दर्शिकांपैकी एक होतीच, पण संपूर्ण कार्यक्रमाची आखणीही तिनेच केली होती. 'रंग मराठी मनाचे' ही

संकल्पनादेखील तिचीच. एवढ्या चमूला घेऊन तयारी करणं, सगळ्यांच्या तालमी नीट होत आहेत ना याची खात्री करून घेणं, लेखक, गायक, सूत्रसंचालक, पडद्यामागचे कलाकार या सगळ्यांना आपला दृष्टिकोन समजावून सगळ्यांकडून उत्तमच काम होईल याकडे लक्ष देणं... हे सगळं खूप अवघड आहे. पण स्मिताने पूर्ण ताकदीनिशी हे करून दाखवलं!

कार्यक्रम समितीचे प्रमुख हर्षद अंणिगेरी आणि अर्चना सोमणे यांनी स्मिताला सहकार्य केलं. अमित देशपांडे आणि मृणालिनी अर्कोटकरांनी सुरेल गाणी गायली. सुशांत खोपकर याने संहितालेखन केले. उमा कानडे आणि अजय कानडे सूत्रसंचालक होते. मुकुंद वानखेडे यांनी प्रकाशयोजना सांभाळली, तर अनिल



अर्कोटकरांनी संगीत संयोजन केले. अभिजय काणे आणि प्राजक्ता काणे यांनी मागच्या पडद्यावरची दृष्ये तयार केली होती.



ती दृष्ये कार्यक्रम चालू असताना बदलण्याची जबाबदारी अजिंक्य धारणेने घेतली.

"आपला संपूर्ण कार्यक्रम Made in Detroit असायला हवा आणि ज्यांना सहभागी होण्याची इच्छा आहे. त्या सर्वांना सामावून घेता आलं पाहिजे." हा विचार अधिवेशनाच्या संयोजिका अंजली अंतुरकरांचा होता. तो विचार या सगळ्या कलाकारांनी उचलून धरला, आणि एकीच्या बळाने, प्रेमाने काय साध्य करता येते हे अवघ्या उत्तर अमेरिकेतल्या मराठी माणसांना दाखवून दिले!

अधिवेशन झाले, की त्याच्या विचारांतून, आठवणींतून बाहेर पडायला जरा वेळ लागतो. रंगपंचमीला रंग खेळल्यानंतर कसे पुढे हळूहळू रंग उतरत जातात, तसंच अधिवेशनांच्या आठवणींचं असतं.. या अधिवेशनात सगळ्यात उशिरा उतरलेले रंग म्हणजे या ओपनिंग सेरेमनीचे... रंग मराठी मनाचे!

(छायाचित्रांसाठी गुणेश कानेटकरांचे आभार.)

***

## BMM 2017 Convention Attendees' Survey Results

BMM Convention Committee sent the survey to attendees on Sunday, July 16th 2017. Out of total **3577** attendees of the convention, in 7 days (by July 23th) **364** attendees sent answers to multiple choice questions in the survey, and hundreds of positive, constructive comments. Few highlights of the responses are as below:

- 364 **responses** Out of total **3577** attendees **as of July 23th**
- When asked about the Overall success of the convention on a scale of 1 to 10, **96.4% ranked it 7 or higher.**
- When asked, will you attend the next convention? **only 1.6% said No**, with 79% saying yes and 20% saying Maybe.
- 59% of respondents arrived by car to the convention and 31% by flight.

Almost universal appreciation for beginning the programs on time, the quality of sound, lights, visuals and dining arrangements.

- One of the largest attendance for Thursday July 6th events such as Business Conference (296), Uttar-Rang (404), Continuing Medical Education conference (106) and Banquet (1008).

(Note: Metrics measured on scale of 1 to 10 (we have counted 7 and above to report the following satisfaction percentage numbers.)

| Description | % |
|---|---|
| Opening ceremony by Detroit | 98.6% |
| Mahesh Kale | 97.6% |
| Grantha Dindi | 97.0% |
| Feeling of safety | 96.9% |
| Food service, delivery, lines etc | 96.4% |
| Email and Other communication | 92.9% |
| Volunteer support | 92.8% |
| Sangeet Sanshay Kallol | 89.2% |
| Hotel experience | 88.1% |
| North America Program Selection | 88.0% |
| Mrudula Dadhe Joshi | 86.9% |
| Haasyadhara | 86.6% |
| Shuttle experience | 86.1% |
| Registration experience | 85.1% |
| CME | 83.9% |
| Mobile app | 83.1% |
| Food menu | 82.8% |
| India Program selection | 80.6% |
| Uttar ranga | 80.0% |
| Sufficient programs for youth | 75.6% |
| Keynote Speech | 72.6% |
| Business conference | 72.3% |
| Tare Zameen Par – Nana and Sonali | 53.9% |
| Bela and Swapnil concert | 33.4% |

# बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचा वृत्तांत

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (रिचमंड, ब्रिटिश कोलंबिया, कॅनडा)

ग्रँड रॅपिड्स, मिशिगन येथे  जुलै, २०१७ साली घडलेले बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १८वे अधिवेशन. आजवर अनुभवलेल्या चारपांच अधिवेशनांपैकी हे सर्वात अधिक नेटके, आणि सर्वांगी सुंदर अधिवेशन. डेट्रॉइट मंडळाकडे असलेले हजारोंच्या संख्येतले मनुष्यबळ आणि प्रायोजकांनी त्यांना दिलेला उदार आश्रय ही यामागची प्रमुख, सबळ कारणे जरी धरली, तरी संयोजकांचे संयोजनकौशल्य, स्थानिक आणि जागतिक कलाकारांची गुणवत्ता आणि शेकडो स्वयंसेवकांची अथक अंगमेहनत, आणि सौजन्य हेही तितकेच महत्त्वाचे. उत्तमोत्तम कार्यक्रम, वैविध्यपूर्ण, चविष्ट, सुग्रास भोजन, आणि राहण्याफिरण्याची योग्य व्यवस्था, या सगळ्यांमुळे हे अधिवेशन यशस्वी ठरले, चिरस्मरणीय झाले.

**काय आवडले?:** वेचक-वेधक कार्यक्रमांची निवड, आणि त्यांचे नीटस आयोजन, एकाच वेळी फार कार्यक्रमांची दाटी न करणे, ठरलेल्या वेळेचे बंधन (बहुतांशी)काटेकोरपणे पाळणे, संयोजकांनी, अध्यक्षांनी पाल्हाळ न लावतां मुद्देसूद भाषणे करणे. ज्येष्ठ नागरिकांची संख्या अधिक, हे गृहीत धरून त्यांच्यासाठी केलेल्या कित्येक सोयी, [उदा. कार्यक्रमांची स्थळे आणि राहण्याची हॉटेले स्काय-वॉकने जोडलेली असल्यामुळे वाहनांच्या रहदारीला टाळून पटापट एकीकडून दुसरीकडे जातां येणे, शटल-बसने जाण्याची सोय, त्यातहि चाकांच्या खुर्चीवरच्यांना प्राधान्य देणे, रांगांची शिस्त पाळणे, खाण्याजेवण्यासाठी ज्येष्ठांना वेगळी वाट दाखवणे, इ.इ.]. अगदी पहिल्याच दिवशी, हॉटेलातून निघून, भर रस्त्यावरून दहाबारा मिनिटे चालून नाश्त्यासाठी डायनिंग हॉलवर आल्यावर जेव्हा आमच्या गळ्यातल्या पट्ट्याच्या रंगाकडे पाहून, आमची व्यवस्था दुसरीकडे आहे, असे द वॉस सेंटरमधील स्वयंसेवकाने सांगितले, तेव्हा मी त्यांना विनंती केली, की आम्ही नुकतेच त्या रस्त्याने आलो, तिथे अशा कोणत्याहि पाट्या नव्हत्या. तर नेमका कोणता दरवाजा आम्ही उघडून आत जायचं, आणि तो कुलूपबंद आहे की उघडा, हे बघायला तुम्ही जरा सोबत याल का? यावर ते बिचारे खरोखरच दाखवायला आले, आणि आम्हाला मन्रो रूम्समधली आमची नेमकी खाण्याची जागा दिसली, नंतर अर्थातच आमचे आम्ही तिथे आतल्या मार्गानेही जाऊयेऊ शकलो. पण त्या स्वयंसेवकांचे हे स्वागताचे सौजन्य मला सुखद वाटले.

अनेक कार्यक्रम उत्तम दर्जाचे होते. गुरुवार संध्याकाळचा झी मराठीचा संगीतवादकांचा परिचयात्मक कार्यक्रम लक्षवेधक. त्या सर्व गुणी कलाकारांची अनेक वाद्ये हाताळण्यातली कारागिरी वाखाणण्याजोगी. 'रंग मराठी मनाचे' हा शुक्रवार ७ जुलैचा, डेट्रॉइट मंडळाने सादर केलेला नमनाचा पहिलाच कार्यक्रम अप्रतिम झाला. तीन तासांच्या या नृत्य-गीत-संगीत कार्यक्रमाची संकल्पना सुंदर-रंगांच्या माध्यमातून महाराष्ट्राची ओळख करून देणे. भगवा, हिरवा, पांढरा वगैरे रंगांशी ऐतिहासिक व्यक्तींचे आणि संस्थांचे, तसेच मानवी भावभावनांचे, प्रासंगिक आणि नित्याचे नाते त्यांनी निवेदनातून अत्यंत नेटक्या शब्दात व्यक्त केले, आणि रंगभूमीवर तेच नाते नृत्य, गीत, वादनातून कलाकारांनी समूर्त केले. यात वीस वेगवेगळे नाच, आणि प्रत्येकात पंधरावीस तरी कलाकार होते, पण पटापट ते स्टेजवर अवतरत, सराईतपणे नाचत, आणि ठरलेल्या वेळात मंचावरून आत जात. यातील मुख्य गायक-गायिका सुरेल गाणारे होते. तीन-चार वर्षांच्या मुलामुलींपासून ते सत्तर-ऐंशीतल्या आजी-आजोबांपर्यंत सगळ्या प्रकारच्या कलाकारांनी या नाचात भाग घेतला. आणि सर्वांचे पोशाख, नेपथ्य, मांडणी आणि नृत्य सगळे काही सुंदर जुळून आले होते. स्थानिक कलाकारांचे हार्दिक अभिनन्दन!

'संगीत संशयकल्लोळ' या भारतातून मागवलेल्या नाटकाचे दोन वेगवेगळ्या वेळी प्रयोग ठेवले होते, हेही उत्तम संयोजनाचे निदर्शकच. कारण दोन्ही वेळच्या प्रयोगांना भरपूर रांगा लावून प्रेक्षक वाट पाहात उभे होते, पण सगळ्यांना ते एकंदरीत आवडलेले दिसले. मुख्य पात्रांनी गाणी चांगली म्हटली, आणि पाच अंकी नाटक दोन अंकात सादर केले तरी गाभा कायम राहिला. प्रशान्त दामले या नटाचे सहज अभिनयाचे कौशल्य अभिजात आहे, पण फाल्गुनरावाच्या भूमिकेला काही वेळां त्यांनी अति-हास्यापद (फार्सिकल) केले, (रेवतीवर आपल्या हातातल्या काठीची सावली धरायला जाणे इ.) ते अनावश्यक वाटले.

मोजक्या कार्यक्रमांना हजेरी लावून बाकी बहुतेक सारा वेळ मी 'एकता' त्रैमासिकाच्या बूथवर जनसंपर्क/स्वयंसेवा करीत होते, त्यामुळे फार कार्यक्रम पाहतां आले नाहीत. पण समारोपाच्या वेळचा महेश काळे या गुणी गायकाचा गायनाचा कार्यक्रम म्हणजे यातला मानाचा तुरा. शास्त्रीय संगीताची महेशला उत्तम जाण, शिवाय हरतऱ्हेच्या गायनाची कळा अवगत. प्रेक्षकांशी संवाद साधत, त्यांना बरोबर घेऊन, स्वयंसेवकांची दखल घेतघेत, एकामागून एक सुरेल, आणि लोकप्रिय गाणी सादर करून, आपल्या सर्व सप्तकातून लीलया फिरणाऱ्या आवाजाच्या जादूने त्यांनी सर्व सभागृहाला खिळवून ठेवले, आणि समारंभाची सांगता एका विलक्षण तृप्तीत घडली.

या अधिवेशनातील एक विशेष स्वागतार्ह घटना म्हणजे युवा विभागात "बीइंग एलजीबीटी" या नावाचा एक कार्यक्रम प्रथमच प्रकाशात आला. सीॲटलमधल्या दिलीप नगरकर या गे युवकाने 'मराठी प्राइड/अभिमान' या शीर्षकाचा एक बूथ या अधिवेशनात उभारला होता. त्यात 'हे आपल्यात असतं!' या समर्पक घोषणेसह काही मराठी गे, लेस्बियन, उभयलिंगी, वगैरेंचे फोटो पोस्टरवर लावले होते, आणि आपल्या समाजातील या लोकांबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न केला होता. या मंडळींच्या प्रामाणिक निवेदनांचे काही व्हिडीओ त्यांच्या

सेशनमधे दाखवले गेले, आणि काहींनी आपापले संघर्षाचे, उपेक्षेचे, मानसिक हालांचे स्वानुभवही प्रांजलपणे सांगितले. त्या चर्चेला मी आणि आमचा मुलगा मुक्तक मुद्दाम जाऊन बसलो, बोललो. जितका सरळसरळ व्यासपीठावरून बोलण्याचा असा अवकाश या मंडळींना मिळेल, तितकेच समाजातील त्यांच्याबद्दलचे गैरसमज, भीती, दुराग्रह दूर व्हायला मदत होणार आहे.

**सुधारतां येण्याजोगें काही?:** अधिवेशनाचे आमचे नेमटॅग्स गळ्यात अडकवताना दिसले, की माझे आणि मुक्तकचे नावच चुकीच्या स्पेलिंगने लिहिलेले होते. स्मरणिकेतही माझे नाव चुकीचेच छापले आहे! नक्कीच सुधारण्याजोगे! भल्या मोठ्या डायनिंग हॉलच्या तीन बाजूंना भिंतींलगत जे तीन ठिकाणी व्यावसायिकांचे बूथ घातले होते, ते किती आणि कुठे कुठे आहेत, याची काहीच माहिती दाराबाहेर ठेवली नव्हती, त्यामुळे कित्येक बूथवर कोणी फिरकलेच नाही, अशी त्यांतील काहींची तक्रार होती. जागोजागी जर आणखी थोड्या माहिती देणाऱ्या पाट्या लावल्या असत्या, तर पुष्कळांची सोय झाली असती.

एकंदरीत उणीवा थोडक्या, आणि वाखाणण्याजोगे पुष्कळच या अधिवेशनात लाभले, त्यामुळे पुन्हा एकदा, संयोजकांचे, स्वयंसेवकांचे मनापासून आभार. 'मंत्र श्रमाचा, ध्यास गतीचा' म्हणत मराठी संस्कृतीचा (गर्व नव्हे, पण) **अभिमान** वाटेल, असंच सर्वजण वागले.

***

*२०१७ सालचे ग्रँड रॅपिड्स येथील बृ. म. मंडळाचे अधिवेशन सर्व बाबतीत उत्तम झाले असा बृहन्महाराष्ट्र वृताला मिळालेल्या सर्व पत्रांचा सूर आहे. म्हणून आम्हाला मिळालेल्या प्रतिक्रियांतील काही संक्षिप्तरित्या येथे देत आहोत. चांगल्या कार्यक्रमांची आणि व्यवस्थेची सर्वांनी तोंडभरून स्तुती केली आहे. तेव्हा तेच पुन्हा न लिहितां, उपस्थितांना जेथे कमतरता भासली तेवढाच प्रतिक्रियेतील भाग खाली देत आहोत. सविस्तर प्रतिक्रिया वाचण्यासाठी संकेतस्थळ:*
**http://bmmonline.org/vrutta-esahitya**

*****

**- वसुंधरा पर्वते** (पुणे):

या वर्षीचं बीएमएम अधिवेशन आजवर सर्वोत्तम ठरलेल्या अनेक अधिवेशनांमधलं एक, असं म्हणावं लागेल.

**- प्रियदर्शन मनोहर** (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया):

बेला शेंडे आणि स्वप्नील बांदोडकरांचा गाण्याचा कार्यक्रम होता. दुर्दैवाने ह्या कार्यक्रमाने बरीच निराशा केली. त्याचं मुख्य कारण मला असं वाटतं, की ह्या गायकांची गाण्यांची निवड चुकली. अमेरिकेतील कित्येक मराठी माणसे भारतीय टीव्हीवरच्या मराठी मालिका बघत नाहीत. त्यामुळे त्या मालिकांची शीर्षकगीते बऱ्याच श्रोत्यांच्या परिचयाची किंवा आवडीची नव्हती.

'एकापेक्षा एक' हा मुलांचा विविध गुणदर्शन ऊर्फ टॅलेन्ट शो चांगला झाला. तरुण मुलांना इथे ह्या संमेलनात व्यासपीठ देण्यात आलं, ही खरंच चांगली गोष्ट आहे.

डेट्रॉइटच्या स्वयंसेवकांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे!

पुढील संमेलनासाठी तीन गोष्टी मी सुचवीन:

१. शक्यतो सर्व कार्यक्रम जवळजवळ व्हावेत, म्हणजे ह्या सत्रांतून त्या सत्रात जाताना फारसे कष्ट पडणार नाहीत किंवा फार वेळ वाया जाणार नाही.

२. मोठया उंच एरिनामध्ये कार्यक्रम असलयास ज्येष्ठ नागरिकांची बसण्याची सोय खालच्या मजल्यावरच करावी, म्हणजे त्यांना अनेक पायऱ्या चढाउतरायला लागणार नाहीत.

३. भारतातून गाण्याचे कार्यक्रम आणल्यास कलाकारांना अमेरिकन मराठी माणसांच्या अभिरुचीची/अपेक्षांची नीट कल्पना द्यावी, म्हणजे त्यांना गाण्यांची योग्य निवड करता येईल.

**- विजया मराठे** (पमोना कॅलिफोर्निया):

सर्व कार्यक्रमांची निवड उत्तम होती. स्थानिक व भारतीय कार्यक्रम एकाच वेळी असूनही सर्व कार्यक्रमांना उपस्थिती भरपूर होते. स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम भारतातील कलाकारांच्या कार्यक्रमाइतकेच उत्तम झाले. सभागृहे शेजारी शेजारी असल्याने थोडा वेळ का होईना पण दोन कार्यक्रमांचा आस्वाद घेता आला.

***

*अधिवेशनातील उपस्थितांपैकी काहींनी, 'नांवात काय आहे,' तेव्हा नांवाऐवजी सूचनांचा विचार व्हावा, अशी विनंती करून पाठविलेल्या काही प्रतिक्रिया:*

१. बहुतेक कार्यक्रम उत्तम होते. (अपवाद, एकदोन कार्यक्रमांचे.)

२. जेवणांसाठी रांगांमधे ताटकळत उभे राहावे लागले नाही. हा अनुभव सुखद होता.

३. अधिवेशनासाठी नांवनोंदणी खूप लवकर- आठ-नऊ महिने अगोदर करूनही मुख्य सभागृहात आम्हाला आसन-व्यवस्था खूप मागे दिली गेली. आणि आमच्याच मित्रमंडळींपैकी काहींनी आमच्यानंतर अधिवेशनाचे रजिस्ट्रेशन करून (आणि ते डोनर नसूनही) त्यांची आसने आमच्यापेक्षा बरीच पुढे होती.

४. संशयकल्लोळ नाटकाला नाट्यगृहाबाहेर प्रेक्षकांची दोन्ही दिवस मोठी रांग होती. त्यातील मध्यंतराच्या वेळी उत्तर अमेरिकेतील लेखकांच्या पुस्तकांचा प्रकाशनसोहोळा दोन दिवसांत विभागला गेल्याने सर्व लेखकांची पुस्तके अधिवेशनातील सर्व उपस्थितांपर्यंत पोहोचली नाहीत. असे लोकप्रिय नाटक व्हॅन अॅन्डेल एरिनासारख्या मुख्य मोठ्या सभागृहात ठेवले असते, तर सर्वांना एकाच दिवशी ते पाहता आले असते, प्रेक्षकांची सभागृहाबाहेरची रांग टाळता आली असती, आणि मध्यंतरामधे सर्वच लेखकांच्या पुस्तकांचा प्रकाशन-सोहोळाही सर्वांपर्यंत पोहोचला असता.

५. गेल्या तीन अधिवेशनांत (२०१३- अजय-अतुल, २०१५- वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, २०१७- बेला शेंडे, स्वप्नील बांदोडकर) मुख्य सभागृहात गाण्याचा कार्यक्रम अतिशय 'लाऊड' झाला. याद्दल पूर्वीही प्रतिक्रिया दिली होती. (वृध्दांना अत्युच्च स्वरातील संगीत -ऑर्केस्ट्रा ऐकतांना त्रास होतो.) असले संगीत कार्यक्रम ठेवावयाचे असल्यास, ५५+ वयोगटासाठी वेगळा संगीत-कार्यक्रम असावा.

**Dr. Prabhakar G. Joshi (Illinois)**

If the cost for printing of the convention brochure 'Asmita' is to be reduced, only outside covers may be glossy and inside paper may be non-glossy.

The food arrangement was superb where the separate arrangement for seniors was quite appropriate and well followed.

During Bela Shende and Swapnil Bandodkar program, the singers and the master of ceremony asked the audience many, many times to join by clapping hands (taalyaa). A presenter need not ask the audience to give hand; the audience should itself be enthused to do so due to the excellence of a performance.

**Girish Godbole (Pittsburgh, PA)**

Three important suggestions for future conventions.

1. **Location** - Having convention in a small city like Grand Rapids was a problem at many levels. The venues were not all at one place and it was a major inconvenience to the older and handicapped people. There were not enough hotel rooms in the immediate connected vicinity of the convention center. Getting to Grand Rapids from most cities in the country was difficult, and required expensive flights and connections.
2. **Seat Assignment** - From my personal experience and the opinion of the several other people was that the seating did not seem to have been done on first-come-first-served basis. I had registered very early and still had very poorly located seats.in the arena from where portions of the stage were not even visible. It will behoove BMM to pay more attention to seating allocations and make sure that it is done in a fair way (announce the criteria for seat assignment and seating charts by sections before registration begins. This will also encourage people to register early and/or become donors, if they don't like the sections they are likely to get assigned to.)
3. **Safety and Security** - I was surprised to see complete absence of any security at and around the convention center (I say this because of number of reasons. e.g. - walking across the bridge to the Holiday Inn was quite unsafe as the bridge and surrounding area was frequented by several homeless people) I feel that there should be at least some basic level of security at BMM conventions given the current atmosphere in the country and given that we have thousands of people attending with ladies wearing expensive jewelry etc. I think BMM should have requested the local police department to provide a couple of police officers at and around the convention center area, especially at night when the programs ended at 11 pm. In many cities, such police presence is provided free of cost to such large events; and even if it were to cost BMM some fees, I would recommend making that investment in the interest of safety and security of our community.

**Anil W. Saraf (Triveni Mitra Mandal, Cincinnati)**

Some shortcomings:

The program agenda went online less than a week prior to the date - wish a general agenda was made available earlier with a "subject to change" disclaimer (so that people would know what they are paying for).

The DeVos theater could have had projection screens (similar to Van Andel) since you could barely see the faces on the stage from the back.

Assigned seats in Van Andel Arena should have had a tiered approach using a combination of cost and time-of-ticketing, especially since it was marketed that way.

All in all, great job and well done Detroit!

## उत्तरंग परिषद २०१७

एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||
चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||

**- वीणा शाह** (वेस्ट ब्लूमफील्ड, मिशिगन)

ग्रँड रॅपिडस, मिशिगन, ६ जुलै, २०१७ची प्रसन्न सकाळ. बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या कित्येक महिने गाजत असलेल्या अठराव्या अधिवेशनाची "उत्तररंग" या संपूर्ण दिवसभराच्या यशस्वी कार्यक्रमाने जोरदार सुरुवात झाली. चारशेदहा ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

"दिवस छानसे, सोनेरीसे
तिन्हीसांजेच्या निरांजनासे"- हे या परिषदेचे ध्येयवाक्य. या ओळींनीच सुरू झालेल्या यथोचित, ओजस्वी आणि सुश्राव्य स्वागतगीताने सर्व श्रोत्यांना जिंकून घेतले. कवयित्री वीणा शाह, संगीतकार अनिरुध्द फाटक, पार्श्वगायक ऋजुता जोशी व अमोल खानापुरकर, संगीत संयोजक नरेंद्र शेठ आणि अकरा गायक यांच्या प्रयत्नांमधून हे गीत साकार झाले.

"नव्या दिशा, नवी आव्हाने" हे सकाळच्या कार्यक्रमाचे सूत्र होते. निवृत्तीनंतर सर्वस्वी वेगळेच असे कार्यक्षेत्र निवडून त्यात नेत्रदीपक कामगिरी केलेले मान्यवर- डॉ. सुधा पाटील व डॉ. अशोक सप्रे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित होते.

यशस्वी Endodontist होऊन निवृत्त झाल्यानंतर डॉ. पाटील यांनी व्हर्जिनियामधे पन्नास एकर जमीन घेऊन, द्राक्षलागवड व उत्तमपैकी मद्यनिर्मितीचे (नर्मदा वाईन्स) प्रयत्न केले. त्यांच्या वाईन्सना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. या रोमहर्षक मार्गामधील चढउतार, अनेक अडचणींशी सामना आणी प्रयत्नपूर्वक मिळविलेले साफल्य या सुरस तरीही प्रेरक कहाणीत श्रोतेजन रंगून गेले.

"बोला पुंडलिक वरदे हारी विठ्ठल......." अशी कीर्तनाच्या उत्तररंगास साजेशी खणखणीत सुरुवात करून डॉ. अशोक सप्रे यांनी सर्वांची मने जिंकून घेतली. उत्तर अमेरिकेतील ज्येष्ठ नागरिकांपुढील समस्या व त्यावरील उपाय, निवृत्तीपश्चात सहनिवासाची शक्यता, ठोस समाजकार्य करण्यास उपलब्ध असलेल्या विविध संधी याबद्दल त्यांनी मौलिक विचार मांडले.

यानंतरच्या माहिती-सत्रातील वक्ते होते- डॉ. राजेश मंगरूळकर (Important Considerations for Older South Asian Adults, serious medical issues and how to prevent them), डॉ. शोभा जोशी (Depression and Dementia, including Alzheimer's, in older adults,

early diagnosis and possible prevention), डॉ. मेधा प्रधान (Chronic pain management- Holistic approach. Prevention of falls using body mechanics). विद्या हर्डीकर-सप्रे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. समारोपात त्यांनी स्त्रियांच्या दृष्टिकोनातून काळजीवाहू- (caregiver) भूमिकेबद्दल काही खुमासदार मुद्दे मांडले, आणि निवृत्तीपश्चात-योगशिक्षक या अनुभवातून वरील वक्त्यांच्या भाषणांमधे मोलाची भरही घातली.

सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व "अथश्री" वसाहतींचे सर्वेसर्वा परांजपे पितापुत्र यांच्या आगामी, उत्तर कॅलिफोर्नियामधील ज्येष्ठनिवासासंबंधी माहितीनंतर अतिशय रुचकर भोजनाचा आस्वाद, प्रियजनांच्या गाठीभेटी, गप्पाटप्पा यांत दुपारचा एक केव्हा वाजला हे कळलेही नाही.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धाची सुरुवात "कांचन-संध्या" या शुभदा शास्त्री लिखित व दिग्दर्शित प्रासंगिक विनोदिकेने (Sit-Com) झाली. उत्तर अमेरिकेतील एका काल्पनिक ज्येष्ठ निवासात घडणारी ही कथा अत्यल्प नेपथ्य व साधीच प्रकाशयोजना असूनही उत्कृष्ट निर्मितीमूल्यांमुळे काळजाचा ठाव घेऊन गेली. हलकेफुलके तरीही अंतर्मुख करणारे खटकेबाज संवाद, सर्व हौशी, ज्येष्ठ कलाकारांचा (पूनम वालावलकर, शीला करवंदे, शैला फाटक, मेधा उमरजी, शरयू दळवी) समरस अभिनय आणि वर्तमान पिढीचे काढलेले रेशमी चिमटे यामुळे हे नाटुकले अगदी अविस्मरणीय असेच झाले.

यानंतरच्या माहितीसत्रामधे ज्येष्ठांच्या जिव्हाळ्याच्या विविध विषयांवर मार्गदर्शन व तज्ज्ञांशी थेट संवाद झाला. विषय व वक्ते असे होते- मिनोती राजपूत (Life planning for retirees/seniors), धनंजय जोशी (Fostering compassionate presence- Planning for the most certain thing in life- Death), डॉ. गजानन सबनीस (Living retired life and understanding finance, tax implications in India and U.S.A.), डॉ. सुधीर वालावलकर (Striving for independence in senior years), सुरेखा समेळ (How to deal with hair loss due to various reasons).

वरील सर्व व्याख्यानांचे महत्त्वाचे मुद्दे BMMonline/uttarrang या वेबसाईटवर लवकरच उपलब्ध होतील.


हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोना सशीतल व लतिका मंगरूळकर यांच्या समर्थ नेतृत्वाखाली आनंद शारंगपाणी, पूनम वालावलकर, शुभदा शास्त्री, शीला करवंदे, अरुणा मेहेंदळे, वीणा शाह या समितीने अनेक महिने मेहेनत घेतली.

२०१५च्या अधिवेशनात झालेली उत्तररंग परिषद ही पहिली परिषद. त्यानंतरची ही दुसरी परिषदही खूपच प्रबोधक झाल्याचे अनेक लोकांनी अभिप्राय दिले. फारशी जाहिरात नसतानाही ४००च्या वर लोकांची उपस्थिती म्हणजे 'मराठी समाजाला या परिषदेची किती आवश्यकता वाटते' याचा बोलका निर्देशांक आहे!

**टीप:** बृ. वृत्ताकडे <u>२०१७च्या अधिवेशनाबद्दल</u> यापुढे येणाऱ्या प्रतिक्रिया वृत्ताच्या फक्त ई विभागात प्रकाशित करू. तसेच, २०१७ व २०१९च्या अधिवेशनाच्या संयोजकांकडे माहितीसाठी पाठवू.

## आमचे दिलीप काका...

- **मंजुषा नाईक** (टॅम्पा, फ्लोरिडा)



३० जून २०१७ रोजी दिलीप चित्रे यांच्या निधनाची दु:खद बातमी आली आणि मनाला हुरहुर लागली. मला अजूनही पाच वर्षांपूर्वीची ती संध्याकाळ आठवते- शोभाकाकी व दिलीपकाका यांचा फोन आला आणि ते आता सन् सिटी सेंटर, फ्लोरिडाचे कायमरूपी निवासी झाले आहेत ही आनंदाची बातमी मिळाली.

कॉलेजच्या दिवसांपासून, अमेरिकेतील एक प्रसिद्ध मराठी लेखक, कवी व नाटककार म्हणून ज्या दिलीप चित्र्यांचे नाव ऐकले होते, ते आता आमच्या फ्लोरिडाचे रहिवासी झाले होते. आम्हा टॅम्पा मंडळींना मनापासून अतिशय आनंद झाला.

मूळ बडोद्याचे, व्यवसायाने आर्किटेक्ट व नंतर शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने आधी इंग्लंड व पुढे अमेरिकेत स्थायिक झालेले दिलीप चित्रे व त्यांचे कुटुंब गेली ४० वर्षे वॉशिंग्टनच्या परिसरात वास्तव्य करून होते, आणि निवृत्तीनंतर या दांपत्याने सन् सिटी सेंटर, फ्लोरिडाची निवड केली.

टॅम्पातील 'अभिरुची' मराठी दिवाळी अंकाच्या सहसंपादिकेच्या कामाच्या निमित्ताने आणि अर्थातच एका प्रसिद्ध साहित्यिकाचे मार्गदर्शन मिळविण्याच्या हेतूने झालेली ओळख; दिलीप चित्रे यांना दिलीपकाका कधी बनवून गेली, हे लक्षातच आले नाही.

अतिशय प्रसन्न, हजरजबाबी, हौशी, स्पष्टवक्ते, उत्तम छायाचित्रकार अशा पैलूंसह बनलेले दिलीपकाका यांनी टॅम्पा-मंडळींना आपलेसे केले होते.

ते आम्हाला लेखक/लेखिका, नाटककार, चित्रकार, संगीतकार यांच्या स्मृतीगंधामधे घेऊन जात.

त्यांचा निवडक वेचक पुस्तक-संग्रह आमच्यासाठी जणुं साहित्याचा खजिनाच! नवोदित व जुन्या विविध लेखक/लेखिकांची पुस्तके यांत आहेत. पुस्तकांची अतिशय टापटिप व सुरेख मांडणी करून, ते अगदी काटेकोरपणे एका छोट्या वहीत आम्ही वाचायला घेतलेल्या पुस्तकांची नांवे टिपून ठेवायला लावीत.

दिलीपकाका स्वतः खवय्ये! त्यामुळे खाण्यापिण्याच्या पदार्थांची आणि विविध ठिकाणच्या

खाद्यप्रकारांची ते कायम माहिती पुरवीत; आणि कधीकधी तर शोभाकाकींकडून त्यांची झलकही चाखायला मिळत असे.

'अभिरुची'च्या कामात मदत व्हावी व साहित्याची आवड जोपासली जावी यासाठी ते कायमच तत्पर होते. त्यांच्या घरी सतत भारतातील सुप्रसिद्ध लेखक, चित्रकार व संगीतकार भेटी देत असत. आणि काका नेहेमी एक घरगुती स्नेहसंमेलन आयोजित करून आम्हाला त्यांच्या भेटी घडवीत. त्यांच्यामुळेच टॅम्पामंडळींचा अपर्णा वेलणकर, कुमार केतकर, डॉ. मोहन आगाशे, चंद्रमोहन कुलकर्णी, दत्ता सराफ, श्री. पानसे आणि महाराष्ट्र फाऊंडेशनच्या 'साहित्य आणि समाजसेवा' पुरस्काराचे संस्थापक श्री. सुनील देशमुख यांच्याशी भेटी झाल्या.

दिलीपकाका हे महाराष्ट्र फाऊंडेशनचे आधारस्तंभ. फाऊंडेशनतर्फे साहित्यिक व सामाजिक योगदानासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी आलेले प्रत्येक पुस्तक, ते वाचून त्यावर झालेल्या गप्पा, मतप्रदर्शनाची संभाषणे मला अजूनही स्मरतात.

त्यांच्या साहित्यिक कार्याचा आढावा घेताना काही गोष्टी नमूद केल्याशिवाय राहावत नाही:

- सतत बारा वर्षे प्रयत्न करून १९८५मधे 'कुंपणापलिकडले शेत' हा भारताबाहेरील लेखकांचा पहिला प्रातिनिधिक कथासंग्रह प्रकाशित केला गेला.

- त्यांचा 'हिमगंध' हा अमेरिकावासी कवीचा पहिला काव्यसंग्रह.

- 'अलिबाबाची हीच गुहा' हे संगीत नाटक त्यांनी रंगभूमीवर आणले. हे नाटक पहिल्या 'जागतिक मराठी परिषदेत' अमेरिकेतील ४०च्यावर लोकांचा ताफा घेऊन त्यांनी सादर केले.

- त्यांच्या गीतांना संगीतकार राम फाटक यांनी चाली दिल्या होत्या. 'स्वर हे पश्चिमरंग' या शीर्षकाखाली ती गीते प्रकाशित झाली.

- फिलाडेल्फियाच्या प्रसिद्ध गुजराती कवयित्री, पन्ना नायक यांच्या विविध कवितासंग्रहातील निवडक कवितांचा मराठीमधे अनुवाद, 'बहिष्कार' नावाच्या कवितासंग्रहात पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रकाशित केला.

- दोन वर्षांपूर्वी 'लोकमत' या वृत्तपत्रातील 'गोरजवेळ' हे त्यांचे सदरही वाचनीय व लोकप्रिय झाले होते. 'सन् सिटी सेंटर' ही प्रामुख्याने निवृत्त झालेल्या लोकांची वसाहत (रिटायरमेंट कम्युनिटी). इथे राहायला आल्यानंतर त्यांना इथले व्यवस्थापन आणि सोयी खूप आवडल्या.

- त्यांना वेगवेगळ्या अनुभवांची गाठोडी घेऊन आलेले मित्र भेटले आणि आयुष्यभरातील घोडदौडी व सुखदु:ख पार केल्यानंतर उतारवयातील आयुष्याकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून, गोरजवेळेचे रंग पाहात आनंद कसा लुटावा, याचे चित्रण त्यांनी या लेखमालेत केले आहे.

आज ते नाहीत, पण त्यांच्या आठवणी, त्यांचे साहित्य आणि साहित्यप्रेम यांचा ठेवा अविस्मरणीय आहे.

त्यांनी लिहिलेले महाराष्ट्र फाऊंडेशनचे प्रेरणागीत हे जणुं त्यांच्या जीवनशैलीचा सारांशच सांगते.

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा ।  
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा ।।

***

## वेध २०१९ मधील बृ. म. मं. अधिवेशनाचे




## वाचन-संस्कृती: चित्र-कल्पना - शीतल वागळे (लॉस अँजलीस), विनता कुलकर्णी (शिकागो)



बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

**यंदा दिवाळी १८ ऑक्टोबरला आहे.**
**दिवाळी अंक आणि दिवाळी फराळ यांची ऑर्डर लवकर नोंदवा.**

**Hindi Film Music on Music Cards**
**200 songs for $15**

**Romantic:**
**Lata Mangeshkar**
**Asha Bhosale**
**Kishore Kumar**
**Mohd. Rafi**
**Sentimental:**
**And many more**

मोहन रानडे यांचे दुसरे पुस्तक बीएम्‌एम्‌ अधिवेशनात प्रकाशित झाले.
एक पुस्तक $१०, दोन पुस्तके $१५







**Neelam Audio & Video, Inc. Tel: 215-354-1423,**
**email: neelamvdo@gmail.com,**
**Web: www.neelam.com**